## बेलापुर नवी मुंबई येथील श्री. भारत एस. गायकवाड, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात

नियमित फौजदारी खटला क्र.१३१५/२०२५
निशाणी क्रमांक : ३

१. गुन्हा घडल्याची तारीख - २७/०५/२०२५

२. गुन्हा नोंदणीची तारीख - २७/०५/२०२५

३. फिर्यादीचे पुर्ण नाव, वय व पत्ता. - शरद रामभाउ खराडे
पोलिस हवाल/२१५४,
तुर्भे पोलीस ठाणे, नवी मुंबई.

४. आरोपीचे पुर्ण नाव व पत्ता - श्री. मोहनलाल पेमाराम प्रजापती
वय : ५२ वर्षे,
रा. : गाळा क्र.४४, इंदिरानगर
झोपडपट्टी, तुर्भे एमआयडीसी,
नवी मुंबई.

५ . गुन्हा कलम - भारतीय न्याय संहिता कलम २८७ अन्वये

गुन्हयाचा तपशील -

तुम्ही वर नमुद दि.२७/०५/२०२५ रोजी रात्री ०८.०० वाजताचे दरम्यान शिवसेना पक्षाचे ऑफिस, तुर्भे एमआयडीसी, नवी मुंबई या ठिकाणी येथील सार्वजनिक ठिकाणी जिवीतास धोका, अटकाव किंवा इजा होईल अशा प्रकारे हातगाडीवर वडापाव व चहा करून विक्री करीत असताना मिळून आला. म्हणुन तुम्ही माझे अधिकार क्षेत्रात भारतीय न्याय संहिता कलम २८७ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला.

१. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या का ?
उत्तर - होय

२. आता तुम्हाला तुमच्यावर ठेवलेला आरोप वाचून दाखविला तो तुम्हाला समजला का?
उत्तर- होय

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे का ?
उत्तर- होय

..................................
आरोपीची सही-

ठिकाण : सि.बी.डी.बेलापुर
दिनांक : १६/०७/२०२५

**(भारत एस. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
बेलापुर, नवी मुंबई.

**: न्यायनिर्णय :**

**(दि.१६ जुलै, २०२५ रोजी जाहीर केला)**

आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम २८७ अन्वये दोषारोप ठेवला आहे.

२. सदरील फिर्यादवरुन गुन्हा क्र.। ३१९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २८७ अन्वये नोंदविण्यात आला. त्यानंतर तपास पूर्ण झाल्याने आरोपीविरोधात दोषारोपपत्र निशाणी ०१ प्रमाणे दाखल करण्यात आले.

३. आरोपीविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम २८७ अन्वये गुन्हयाचा तपशिल वाचुन व समजावुन सांगीतला असता आरोपीनी **निशाणी क्र.२** वर गुन्हा कबुल असल्याची पुरशिस दाखल केली व त्याद्वारे त्याने गुन्हा कबुल केला.

४. आरोपीने स्वत:हुन गुन्हा कबुल केला. आरोपीला गुन्हा कबुल करण्याचे सर्व परिणाम / दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. तसेच काही प्राथमिक स्वरूपाचे प्रश्न विचारले व पुन्हा त्यास दोषारोप कबुल

करण्याच्या परिणामांची जाणीव करून दिली असता अशी खात्री होते की आरोपीने गुन्हा स्वेच्छेने कबुल केला आहे. आरोपीने गुन्हा कबुल केल्याने त्यास कायदेशिररित्या शिक्षा देणे बंधनकारक आहे. त्यामुळे सरकार पक्षास व आरोपीस शिक्षेविषयी ऐकण्यात आले.

५. आरोपीने गुन्हा कबुल केल्यामुळे त्याला शिक्षेविषयी ऐकण्यात आले. आरोपीने त्याचेवर दया दाखविण्यात यावी असे नमुद केले कारण की, हा आरोपीचा प्रथम गुन्हा होता. तसेच यापुढे अशा प्रकारचा गुन्हा करणार नाही याची हमी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांस ऐकण्यात आले. अभियोग पक्षाने आरोपीस कोणतीही दया न दाखवता जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

६. सदरील गुन्हयाची संक्षिप्त स्वरूप बघता तसेच आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केल्यामुळे त्यास दोषी ठरविण्यात येत आहे. आदेश खालीलप्रमाणे,

**-: आ दे श :-**

**१.** आरोपी मोहनलाल पेमाराम प्रजापती यास भारतीय न्याय संहिता कलम २८७ या गुन्हयाकामी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७५ अन्वये दोषी ठरविण्यात येत आहे व रक्कम रू.१,०००/- दंडाची शिक्षा फर्माविण्यात येत आहे. तसेच दंडाची रक्कम न भरल्यास १० दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

**२.** न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात येत आहे.

BHARAT SAMBHAJI GAIKWAD
Digitally signed by BHARAT SAMBHAJI GAIKWAD
Date: 2025.07.16 18:04:56 +0530

ठिकाण : सि.बी.डी.बेलापुर
दिनांक : १६/०७/२०२५

**(भारत एस. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
बेलापुर, नवी मुंबई.